

सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर



# महापालिकेचे आयुक्त शीतल तेली-उगले यांनी घेतला मान्सूनपूर्व आढावा..

Volume III | Issue 14 | Date 29-05-2024

शहरातील मान्सूनपूर्व नाले सफाई चे कामे 81% पूर्ण

येत्या 31 मे पर्यंत मानसून पूर्व नाले सफाई व इतर कामे पूर्ण करण्याचे आयुक्तांनी दिले आदेश...

सोलापूर --सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने मान्सूनपूर्व कामे सुरू असून सोलापूर शहरातील क्षेत्र एकूण 178 स्क्वेअर किलोमीटर असून त्यामध्ये 42 किलोमीटरचे उघडे नाले आहेत.तसेच वेगवेगळ्या डायमीटरचे 217 किलोमीटरचे ड्रेनेज लाईन याशिवाय 25 हजार 500 इतके मॅन हॉल संपूर्ण शहरामध्ये आहेत. आतापर्यंत मान्सूनपूर्व नालेसफाई 81 टक्के कामे पूर्ण करण्यात आली आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शीतल तेली- उगले यांनी आज मान्सूनपूर्व आढावा बैठक घेण्यात आला.त्यामध्ये एक ते आठ विभागीय कार्यालय,मुख्य कार्यालय तसेच नगर अभियंता, पाणीपुरवठा विभाग,उद्यान विभाग, आरोग्य विभाग, अग्निशामन विभाग, आपत्कालीन विभाग आदी विभागाचा आढावा घेतला असून सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांना 31मे पर्यंत मान्सूनपूर्व कामे पूर्ण करण्याचे आदेश महापालिकेचे आयुक्त शितल तेली- उगले यांनी दिली. तसेच सोलापूर शहरातील जुने धोकादायक इमारतीचे सर्वेक्षण सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने पूर्ण करण्यात आल्या असून त्यामध्ये C-1 श्रेणीमधील अति धोकादायक इमारत आहेत. 15 इमारत पैकी 7 इमारत पाडकाम संबंधित मालकांकडून करण्यात आलेले आहेत.उर्वरित इमारतीचे पाडकाम लवकरच पूर्ण करण्यात येईल.ज्या इमारती अति धोकादायक आहेत अशा इमारतीच्या दर्शनी भागावर महानगरपालिकेच्या वतीने धोकादायक इमारत आहे अशी बोर्ड लावण्यात येतील.

पावसाळ्याच्या कालावधीत शहरातील विविध भागातील वादळी वाऱ्यामुळे झाडे उमळून पडणे, धोकादायक फांद्या पडणे अशा घटना घडतात अशा घटना होऊ नये म्हणून त्यासाठी उद्यान विभागाला सतर्क राहण्याचे आदेश दिले. सोलापूर शहरातील रस्त्यावरील सर्व खड्डे मान्सूनपूर्व प्रेमिक्सने खड्डे भरून महानगरपालिकेच्या वतीने बुजवण्यात आले आहे. तसेच N-CAP मधून सोलापूर महानगरपालिकेने आतापर्यंत 40 रस्ते गेल्या दोन वर्षात तयार करण्यात आलेले आहेत.त्यामुळे शहरातील खड्ड्यांचे प्रमाण हे कमी झाले आहेत .

तरीही पावसाळ्याच्या कालावधीमध्ये ज्या रस्त्यांवर खड्डे पडतात त्या ठिकाणी मुरूम भरून बुजवण्यात येणार आहे.मान्सूनपूर्व काळात लागणारी सर्व साहित्य महापालिकेच्या वतीने खरेदी करण्यात आली आहे. सोलापूर महानगरपालिकेचे आपत्कालीन विभाग हे 24 तास कार्यान्वित असून या ठिकाणी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. शहरातील आपत्कालीन विभागाशी संपर्क साधण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने टोल फ्री क्रमांक संपर्क --18002331916 उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच सोलापूर महानगरपालिकेच्या आपत्कालीन आराखडा 2023-24 अपडेट आराखडा पूर्ण तयार करण्यात आले असून सोलापूर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर नागरिकांना माहिती व्हावी यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने मान्सूनपूर्व काळामध्ये कोणतेही जीवितहनी व वित्त हनी होऊ नये म्हणून सर्व कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. मान्सूनपूर्व सर्व कामे हे 31 मे च्या आत पूर्ण करण्याचे आदेश महापालिकेची आयुक्त शीतल तेली -उगले यांनी सर्व अधिकाऱ्यांना यावेळी दिले.याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे,उपायुक्त आशिष लोकरे,उपायुक्त तैमुर मुलानी,सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, संचालक नगररचना मनीष भीष्णूकर, नगर अभियंता सारिका अक्कलवार, सार्वजनिक आरोग्य कार्यकारी अभियंता व्यंकटेश चौबे, विद्युत कार्यकारी अभियंता राजेश परदेशी,आरोग्य अधिकारी मंजिरी कुलकर्णी, सर्व विभागीय अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.